# कार्यालय,नागपूर महानगरपालिका,नागपूर

**सामान्य प्रशासन विभाग**

**१ ला मजला,नविन प्रशासकिय इमारत, महानगरपालिका मार्ग**

**सिव्हील लाईन,नागपूर-४४०००१**

**दुरध्वनी क्र- ०७१२-२५६७०३२/१८३ (ईमेल gadnmcnagpur@gmail.com)**


आजादी का अमृत महोत्सव

G20

**पत्र क्र. : - साप्रवि/वि.स.ता/ 28 /२०२३** **दिनांक :-२४/११/२०२३**

**विधानमंडळ कामकाज/ कालमर्यादा /अति-तातडीचे**

प्रति,

मा. कार्यकारी अभियंता
कारखाना विभाग
महानगरपालिका नागपूर.

विषय :- **विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ७२७५८.**
**"नागपूर महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी पर्यावरण विभागाच्या आदेशात उल्लंघन केल्याबाबत".**

संदर्भ :- मा.कक्ष अधिकारी नगर विकास विभाग,महाराष्ट्र शाषन यांचे पत्र क्र.विसताप्र-१७२३/प्र.क्र.२३५/नवि-२६ दिनांक.२३/११/२०२३.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, विधानसभा तारांकित प्रश्न ७२७५८. मा. श्री. मोहन मते मा. विधानपरिषद सदस्य यांनी उपस्थित केलेआहे. ठरावाच्या अनुषंगाने आपल्या विभागाशी संबंधित मुद्दा असल्यामुळे पाठविण्यात येत आहे. करीता स्वयंस्पष्ट अहवाल, पुरक टिप्पणीसह मुद्देनिहाय ud२०.urban-mh@mah.gov.in व vidya.hampayy@nic.in शासनाच्या संकेतस्थळावर पाठवण्यात यावी, तसेच पाठवण्यात येणाऱ्या उत्तराची एक प्रत gadnmcnagpur@gmail.com या ईमेलवर प्रत सुलभ माहितीसाठी या कार्यालयास पाठविण्याची विनंती आहे.

सहपत्र :- संदर्भिय पत्र

सहाय्यक अधिक्षक
सामान्य प्रशासन विभाग
महानगरपालिका नागपूर

प्रतिलीपी :-

१) मा. उपायुक्त, साप्रवि, म.न.पा. नागपूर यांना माहितीस्तव सादर.
२) मा. सहा. आयुक्त साप्रवि, म.न.पा. नागपूर यांना माहितीस्तव सादर.

Ramteke 29/11/23

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग
४ था मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
**दुरध्वनी क्र.**- २२७९४२०६
**मो.नं.** ९८७०२४७०२४, ७७३८१९३२९१
Email ID :- ud26.urban-mh@mah.gov.in
vidya.hampayya@nic.in

---

**क्रमांक :- विसताप्र-१७२३/प्र.क्र.२३५/नवि-२६**

**दिनांक :-२३/११/२०२३**

प्रति,

आयुक्त,
नागपूर महानगरपालिका,
नागपूर

विषय:-विधानसभा तारांकित प्रश्न क्र.७२७५८
"नागपूर महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी पर्यावरण विभागाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याबाबत."

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत श्री. मोहन मते, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेल्या तारांकित वस्तुस्थिती प्रश्नाची प्रत सोबत जोडली आहे. यानुषंगाने सविस्तर पूरक टिप्पणी व आवश्यक त्या कागदपत्रांसह आपला स्वयंस्पष्ट अहवाल PDF Format व Word File (Sakal Marathi) मध्ये शासनास ud२६.urban-mh@mah.gov.in व vidya.hampayya@nic.in या Email-Id वर तात्काळ पाठविण्यात यावा, ही विनंती.

आपली,

(प्रियंका चौधरी)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**सोबत: वरील प्रमाणे**

क्रमांक - _____ / ब-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
दिनांक : २३-११-२०२३

प्रेषक:

सचिव-१ (कार्यभार),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

**उप सचिव**
**नगर विकास विभाग**
महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**विषय: विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक - ७२७५८**

महोदय,

**उपरिनिर्दिष्ट प्रश्नाबाबतची वस्तुस्थिती** या सचिवायलास **त्वरीत दोन दिवसात कळवावी** अशी विनंती आहे.

सदरहू प्रश्न स्वीकृत करण्यासारख्या आहे की नाही हे ठरविण्यासाठी ही माहिती आवश्यक असून ती हे पत्र मिळाल्यापासून दोन दिवसांच्या आत या सचिवालयास कळवावी. उक्त अवधीत आपणाकडून माहिती न आल्यास, प्रश्न स्वीकृत होऊन तो शासनाकडे उत्तरासाठी पाठविला जाण्याची शक्यता आहे

सदरहू प्रश्न स्वीकृत झाल्यास, तो दिनांक १९-१२-२०२३ रोजी उत्तरासाठी ठेवण्यात येईल.

आपला

कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

---

**विषय - नागपूर महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी पर्यावरण विभागाच्या आदेशचे उल्लंघन केल्याबाबत**

**श्री. मोहन मते (नागपूर दक्षिण)**

**सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

१. सरकार, निमसरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी दि. १ जानेवारी, २०२२ पासून विजेवर चालणाऱ्या वाहनांचीच (इव्हि) खरेदी करावी, तसेच दि. १ एप्रिल, २०२२ पासून भाड्यानेही विजेवर चालणारी वाहने घ्यावीत, असे आदेश राज्याच्या पर्यावरण विभागाने दि. २९ डिसेंबर, २०२१ रोजी दिले आहेत, हे खरे आहे काय;

२. असल्यास, सदरहू आदेशाचे उल्लंघन करून नागपूर महानगरपालिकेच्या कारखाना विभागाने तब्बल ११४ डिझेल व पेट्रोल आधारित वाहनांची खरेदी दि. १ एप्रिल, २०२२ ते २३ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत केली आहे, हे ही खरे आहे काय;

३. असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पर्यावरण विभागाच्या आदेशाचे उल्लंघन करून विजेवर चालणाऱ्या वाहनांची खरेदी न करणाऱ्या नागपूर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे;

४. नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकिय इमारत सिव्हील लाईन नागपुर

क्रमांक जा. 18/EE/W.S

दिनांक :— 6/12/2023

प्रति,
कक्ष अधिकारी,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन.

विषय :— विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ७२७५८
मा. श्री. मोहन मते विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेला प्रश्न ''नागपूर महानगरपालिकेतील अधिका-यानी पर्यावरण विभागाच्या आदेशात उल्लंघन केल्याबाबत''.

संदर्भ :— म.न.पा सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. साप्रवि/वि.स.ता/ २८/२०२३, दि. २४/११/२०२३

| अ.क्र. | विचारलेला प्रश्न | खुलासा |
|---|---|---|
| १ | सरकार, निमसरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी दि. १ जानेवारी, २०२२ पासून विजेवर चालणा-या वाहनांचीच (इव्हि) खरेदी करावी, तसेच दि. १ जानेवारी, २०२२ पासून भाड्यानेही विजेवर चालणारी वाहने घ्यावीत, असे आदेश राज्याच्या पर्यावरण विभागाने दि. २९ डिसेंबर, २०२१ रोजी दिले आहेत, हे खरे आहे काय; | ''होय'' हे खरे आहे. |
| २ | असल्यास, सदरहू आदेशाचे उल्लंघन करुन नागपूर महानगरपालिकेच्या कारखाना विभागाने तब्बल ११४ डिझेल व पेट्रोल आधारित वाहनांची खरेदी दि. १ एप्रिल, २०२२ ते २३ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत केली आहे, हे ही खरे आहे काय; | नागपूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता ''स्वच्छ भारत अभियान-1.0''अंतर्गत सद्यस्थितीत १०४ डिझेलवर चालणारी वाहने/ मशिनरी खरेदी केले आहे.<br>१) Light commercial vehicle-50 Nos.<br>२) Medium goods vehicle (Tipper) -10 Nos.<br>३) Heavy goods vehicle (Tipper)-10 Nos.<br>४) Back-hoe Loader -10 Nos.<br>५) Hydraulic Excavator (Poclain Machine)-10 Nos.<br>६) Mahindra Bolero & XUV-300 Supervisor Vehicles (10+04)-14 Nos. |

| | | |
|---|---|---|
| | | उक्त नमुद वाहने/मशिनरी GeM पोर्टलवर बिड प्रक्रिये अंतर्गत ठरविण्यात आलेल्या वाहनांच्या प्रकारात फक्त डिझेल वाहने उपलब्ध असल्यामुळे शासन निर्णयाचे उल्लघंन झालेले नाही. |
| ३ | असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पर्यावरण विभागाच्या आदेशाचे उल्लंघन करुन विजेवर चालणा-या वाहनांची खरेदी न करणा-या नागपूर महानगरपालिकेच्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे; | सदर बाब शासनाशी संबंधीत आहे. |
| ४ | नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत? | सदर बाब शासनाशी संबंधीत आहे. |

अति. आयुक्त (सामान्य)
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

# पुरक टिपणी

**विषय :- विधानसभा तारांकीत प्रश्न क्र. ७२७५८**
**"नागपूर महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी पर्यावरण विभागाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याबाबत".**

नागपूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कार्यासाठी आवश्यक वाहने व मशिनरी स्वच्छ भारत अभियान १.० अंतर्गत उपलब्ध शासन निधीतून खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. स्वअस – २०२० / प्र.क्र. १७ (९) नवि – ३४ दि. ३०/०१/२०२० तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. स्वअस-२०२१/ प्र.क्र.२६/नवि-३४, दि.१४/०५/२०२१ नुसार वाहने / मशिनरी खरेदी करीता मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे ठराव क्र. २४०, दि.०३/०२/२०२३ नुसार मान्यता प्राप्त आहे. या अनुषंगाने Common Set Up अंतर्गत Vehicles for primary Collection अंतर्गत Open Truck (5 tons) Tipper (5 cu.m) व Pick up van व Vehicles for Secondary Collection & transportation अंतर्गत Backhoe Loader, Tipper (8.5 cu.m) व Chain crawled excavators खरेदी करण्यासाठी मा.आयुक्त तथा प्रशासन यांनी दिलेल्या मंजूरीप्रमाणे कारखाना विभागातर्फे शासन मान्य Gem या पोर्टलवरुन रितसर कारवाई करुन खालिल नमूद प्रकाराची १०४ वाहने / मशिनरी खरेदी करण्यात आली आहे.

1) Light commercial vehicle – 50 Nos.
2) Medium gooods vehicle (Tipper) – 10 Nos.
3) Heavy goods vehicle (Tipper) – 10 Nos.
4) Back – hoe Loader-10 Nos.
5) Hydraulic Excavator (Poclain Machine) – 10 Nos.
6) Supervisory Vehicles (Mahindra Bolero & XUV-300) -14 Nos.

उक्त नमूद वाहने/मशिनरीची खरेदी करुन नामपूर महानगरपालिकेतील ०१ ते १० झोनला हस्तांतरीत करण्यात आले आहे व उर्वरीत १० नग Open Truck खरेदी प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. खरेदी करण्यात आलेले एकूण १०४ वाहने/मशिनरी या Gem पोर्टलवर बिड प्रक्रियेअंतर्गत ठरविण्यात आलेल्या वाहनांच्या प्रकारात फक्त डिझेल वाहने उपलब्ध असल्यामूळे शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले नाही.

कार्यकारी अभियंता
यांत्रिकी (कारखाना) विभाग
नागपूर महानगरपालिका, नागपूर

यांत्रिकी अभियंता
यांत्रिकी (कारखाना) विभाग
नागपूर महानगरपालिका, नागपूर

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकिय इमारत सिव्हील लाईन नागपुर

क्रमांक जा. 18/EE/W.S  दिनांक :– 6/12/2023

प्रति,
कक्ष अधिकारी,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन.

विषय :— विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ७२७५८
मा. श्री. मोहन मते विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेला प्रश्न ''नागपूर महानगरपालिकेतील अधिका-यानी पर्यावरण विभागाच्या आदेशात उल्लंघन केल्याबाबत''.

संदर्भ :— म.न.पा सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. साप्रवि/वि.स.ता/ २८/२०२३, दि. २४/११/२०२३

| अ.क्र. | विचारलेला प्रश्न | खुलासा |
|---|---|---|
| १ | सरकार, निमसरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी दि. १ जानेवारी, २०२२ पासून विजेवर चालणा-या वाहनांचीच (इव्हि) खरेदी करावी, तसेच दि. १ जानेवारी, २०२२ पासून भाड्यानेही विजेवर चालणारी वाहने घ्यावीत, असे आदेश राज्याच्या पर्यावरण विभागाने दि. २९ डिसेंबर, २०२१ रोजी दिले आहेत, हे खरे आहे काय; | ''होय'' हे खरे आहे. |
| २ | असल्यास, सदरहू आदेशाचे उल्लंघन करुन नागपूर महानगरपालिकेच्या कारखाना विभागाने तब्बल ११४ डिझेल व पेट्रोल आधारित वाहनांची खरेदी दि. १ एप्रिल, २०२२ ते २३ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत केली आहे, हे ही खरे आहे काय; | नागपूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता ''स्वच्छ भारत अभियान-1.0''अंतर्गत सद्यास्थितीत १०४ डिझेलवर चालणारी वाहने/ मशिनरी खरेदी केले आहे.<br>१) Light commercial vehicle-50 Nos.<br>२) Medium goods vehicle (Tipper) -10 Nos.<br>३) Heavy goods vehicle (Tipper) -10 Nos.<br>४) Back-hoe Loader -10 Nos.<br>५) Hydraulic Excavator (Poclain Machine)-10 Nos.<br>६) Mahindra Bolero & XUV-300 Supervisor Vehicles (10+04)-14 Nos. |

| | | |
|---|---|---|
| | | उक्त नमुद वाहने/मशिनरी GeM पोर्टलवर बिड प्रक्रिये अंतर्गत ठरविण्यात आलेल्या वाहनांच्या प्रकारात फक्त डिझेल वाहने उपलब्ध असल्यामुळे शासन निर्णयाचे उल्लघंन झालेले नाही. |
| ३ | असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पर्यावरण विभागाच्या आदेशाचे उल्लंघन करुन विजेवर चालणा-या वाहनांची खरेदी न करणा-या नागपूर महानगरपालिकेच्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे; | सदर बाब शासनाशी संबंधीत आहे. |
| ४ | नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत? | सदर बाब शासनाशी संबंधीत आहे. |

अति. आयुक्त (सामान्य)
नागपूर महानगरपालिका, नागपूर.